श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील तालुक्या मध्ये असणाऱ्या गावातील जमिनी सन २०२४ – २०२५ या वर्षासाठी ११ महिने भाडे पटटयाने देणे बाबतचा तपशिल खालील प्रमाणे.

## १) सातारा जिल्हा

| अ. क्र. | लातुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | कराड | आटके | 13 | 3.34 | १००२०० | | १००२०० | |
| | | कालवडे | 5 | 3.15 | ९४५०० | | ९४५०० | |
| | | काले | 39 | 16.59 | ४९४४०० | | ४९४४०० | |
| | | विंग | 1 | 1.64 | ४९२०० | | ४९२०० | |
| | | हेळगांव | 3 | 0.97 | २९१०० | | २९१०० | |
| | | गोलेश्वर | 7 | 0.95 | २८५०० | | २८५०० | |
| | | पाचवडवस्ती | 3 | 0.68 | २०४०० | | २०४०० | |
| | | जाधवमळा | 1 | 0.78 | २३४०० | | २३४०० | |
| | | किवळ | 8 | 0.72 | २१६०० | | २१६०० | |
| | | वडगाव हवेली | 3 | 0.29 | ८७०० | | ८७०० | |
| | | दुशेरे | 9 | 0.40 | १२००० | | १२००० | |
| | | बेलवडे ब्रु. | 3 | 0.62 | १८६०० | | १८६०० | |
| | | शिरवडे | 1 | 1.68 | ५०४०० | | ५०४०० | |
| | | कोरेगाव | 2 | 2.00 | ६०००० | | ६०००० | |
| | | भुयाचीवाडी | 2 | 0.75 | २२५०० | | २२५०० | |
| | | पेरले | 1 | 0.38 | ११४०० | | ११४०० | |
| | | वडोली भिकेश्वर | 3 | 1.03 | ३०९०० | | ३०९०० | |
| | | | | | | | | |
| | जिल्हा | सातारा | 104 | 35.97 | **१०७५८००** | | **१०७५८००** | |
| | तालुका | १ | | | | | | |
| | गावे | १७ | | | | | | |
| | गट | १०४ | | | | | | |

## २) सोलापूर  जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पंढरपूर | शेवते | 1 | 1.88 | ५६४०० | | ५६४०० | |
| | | पंढरपूर | 3 | 3.35 | १००५०० | | १००५०० | |
| २ | माळशिरस | माळशिरस | 1 | 3.23 | ९६९०० | | ९६९०० | |
| ३ | मोहोळ | पापरी | 1 | 2.24 | ६७२०० | | ६७२०० | |
| | | मसलेचौधरी | 2 | 6.20 | | १२४००० | १२४००० | |
| ४ | उत्तर सोलापूर | वडाळा | 1 | 6.81 | २०४३०० | | २०४३०० | |
| | | बेलाटी | 1 | 1.08 | | २१६०० | २१६०० | |
| | | नरोटेवाडी | 1 | 4.41 | | ८८२०० | ८८२०० | |
| ५ | दक्षिण सोलापूर | औज अहेरवाडी | 1 | 4.45 | | ८९००० | ८९००० | |
| ६ | करमाळा | शेलगाव वांगी | 1 | 2.03 | | ६०९०० | ६०९०० | |
| | | वांगी नं.२ | 1 | 9.11 | | १८२०० | १८२०० | |
| | | लव्हे | 3 | 7.11 | | १४२२०० | १४२२०० | |
| | | | | | | | | |
| | जिल्हा | सोलापूर | 17 | 51.90 | **५२५३००** | **५४४१००** | **१०६९४००** | गट |
| | तालुके | ६ | बागाईत | 17.51 | ५२५३०० | | | ७ |
| | गावे | १२ | जिराईत | 34.39 | ५४४१०० | | | १० |
| | गट | १७ | एकुण | 51.90 | १०६९४०० | | | १७ |

## ३) सांगली जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | पलूस | सुर्यगांव | 7 | 1.20 | | २४०००० | २४००० | |
| | | नागठाणे | 1 | 1.69 | | ३३८०० | ३३८०० | |
| | | पलूस | 1 | 2.62 | | ५२४०० | ५२४०० | |
| २ | आटपाडी | हिवतड | 1 | 21.16 | | ४२३२०० | ४२३२०० | |
| | | | | | | | | |
| | | | 10 | 26.67 | | ५३३४०० | ५३३४०० | |
| | जिल्हा | सांगली | | | | | | |
| | तालुके | २ | | | | | | |
| | गाव | ४ | | | | | | |
| | गट | १० | | | | | | |

### ४) कोल्हापूर जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | शिरोळ | कोथळी | 2 | 4.62 | १३८६०० | | १३८६०० | |
| | गडहिंग्लज | हडलगे | 1 | 0.71 | | १४२०० | १४२०० | |
| | | वाघराळी | 2 | 2.67 | | ५३४०० | ५३४०० | |
| | | गडहिंग्लज | 2 | 2.11 | | ५५५०० | ५५५०० | |
| | | | | | | | | |
| | | | 7 | 10.11 | १३८६०० | १२३१०० | २६१७०० | |
| | बागाईत | २ | 4.62 | 138600 | | | | |
| | जिराईत | ५ | 5.49 | 123100 | | | | |
| | | ७ | 10.11 | 261700 | | | | |
| | | | | | | | | |
| | जिल्हा | कोल्हापूर | | | | | | |
| | तालुके | २ | | | | | | |
| | गाव | ४ | | | | | | |
| | गट | ७ | | | | | | |

## ५) अकोला जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | बार्शी टाकळी | देवदरी | 1 | 4.26 | | ८५२०० | ८५२०० | |
| २ | अकोट | कुटासा भाग १ | 1 | 7.06 | | १४१२०० | १४१२०० | |
| ३ | मुर्तिजापूर | पिंपळशेंडा | 1 | 8.16 | | १६३२०० | १६३२०० | |
| | | | | | | | | |
| | | | 3 | 19.48 | | ३८९६०० | ३८९६०० | |
| | जिल्हा | अकोला | | | | | | |
| | तालुके | ३ | | | | | | |
| | गाव | ३ | | | | | | |
| | गट | ३ | | | | | | |

## ६) अमरावती जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | नांदगांव खंडेश्वर | खरबीगुंड | 1 | 2.09 | | ४१८०० | ४१८०० | |
| | | कंझरा | 1 | 1.44 | | २८८०० | २८८०० | |
| | | गावनेर तळेगांव | 1 | 0.78 | | १५६०० | १५६०० | |
| | | चिखलीवैद्य | 1 | 6.16 | | १२३२०० | १२३२०० | |
| | | वाटपूर | 1 | 1.18 | | २३६०० | २३६०० | |
| | | जयसिंगा | 1 | 3.07 | | ६१४०० | ६१४०० | |
| २ | अंजनगावसूर्जी | भंडारज | 1 | 2.83 | | ५६६०० | ५६६०० | |
| | | | | | | | | |
| | | | 7 | 17.55 | | ३५१००० | ३५१००० | |
| | जिल्हा | अमरावती | | | | | | |
| | तालुके | २ | | | | | | |
| | गाव | ७ | | | | | | |
| | गट | ७ | | | | | | |

## ७) यवतमाळ जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | राळेगांव | विरूळ | 1 | 0.81 | | १६२०० | १६२०० | |
| २ | दारव्हा | शेंद्री | 2 | 32.34 | | ७००८०० | ७००८०० | |
| | | तळेगांव | 1 | 0.81 | | १६२०० | १६२०० | |
| ३ | नेर | नाथ्रड | 1 | 1.03 | | २०६०० | २०६०० | |
| | | सावरगांव | 1 | 7.49 | | १४९८०० | १४९८०० | |
| | | कारखेडा | 1 | 1.84 | | ३६८०० | ३६८०० | |
| | | | | | | | | |
| | | | 7 | 44.32 | | ९४०४०० | ९४०४०० | |
| | जिल्हा | यवतमाळ | | | | | | |
| | तालुके | ३ | | | | | | |
| | गाव | ६ | | | | | | |
| | गट | ७ | | | | | | |

## ८) बुलढाणा जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मलकापूर | दाताळा | 1 | 1.02 | | २०४०० | २०४०० | |
| २ | संग्रामपूर | चौंडी | 1 | 1.17 | | २३४०० | २३४०० | |
| | | | | | | | | |
| | | | 2 | 2.19 | | ४३८०० | ४३८०० | |
| | जिल्हा | बुलढाणा | | | | | | |
| | तालुके | २ | | | | | | |
| | गाव | २ | | | | | | |
| | गट | २ | | | | | | |

## ९) धाराशिव (उस्मानाबाद) जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | परांडा | करंजा | 1 | 7.81 | | १५६२०० | १५६२०० | |
| | | | | | | | | |
| | | | 1 | 7.81 | | १५६२०० | १५६२०० | |
| | जिल्हा | धाराशिव | | | | | | |
| | तालुका | १ | | | | | | |
| | गाव | १ | | | | | | |
| | गट | १ | | | | | | |

## १०) नागपूर जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | नरखेड | भिष्णुर | 3 | 6.52 | | १३०४०० | १३०४०० | |
| २ | कळमेश्वर | खानगाव | 1 | 1.25 | | २५००० | २५००० | |
| | | धापेवाडा | 1 | 3.12 | | ६२४०० | ६२४०० | |
| ३ | उमरेड | लोहारा | 1 | 7.16 | | १४३२०० | १४३२०० | |
| | | | | | | | | |
| | | | 6 | 18.05 | | ३६१००० | ३६१००० | |
| | जिल्हा | नागपूर | | | | | | |
| | तालुके | ३ | | | | | | |
| | गाव | ४ | | | | | | |
| | गट | ६ | | | | | | |

## ११) वर्धा जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | समुद्रपूर | मांडगाव | 1 | 0.20 | | ४०००० | ४००० | |
| | | सावंगी | 1 | 3.84 | | ७६८०० | ७६८०० | |
| | | | | | | | | |
| | | | 2 | 4.04 | | ८०८०० | ८०८०० | |
| | जिल्हा | वर्धा | | | | | | |
| | तालुके | १ | | | | | | |
| | गाव | २ | | | | | | |
| | गट | २ | | | | | | |

# १२) अहमदनगर जिल्हा

| अ.क्र. | तालुका | गाव | गट | क्षेत्र हे.आर | बागाईत भाडे पटटा रक्कम रूपये | जिराईत भाडे पटटा रककम रूपये | एकुण भाडे पटटा रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्रीगोंदा | देऊळगाव | 1 | 3.10 | | ६२००० | ६२००० | |
| | | पिसोरेखांड | 1 | 2.70 | | ५४००० | ५४००० | |
| | | चिखलठाणवाडी | 2 | 23.76 | | ४७५२०० | ४७५२०० | |
| २ | नेवासा | रामडोह | 1 | 2.20 | | ४४००० | ४४००० | |
| | | सोनाई | 2 | 5.67 | | ११३४०० | ११३४०० | |
| | | चांदा | 1 | 11.20 | | २२४००० | २२४००० | |
| | | घोडेगाव | 1 | 6.21 | | १२४२०० | १२४२०० | |
| | | सलाबतपूर | 1 | 1.41 | | २८२०० | २८२०० | |
| | | | | | | | | |
| | | | 10 | 56.25 | | ११२५००० | ११२५००० | |
| | जिल्हा | अहमदनगर | | | | | | |
| | तालुके | २ | | | | | | |
| | गाव | ८ | | | | | | |
| | गट | १० | | | | | | |

अर्जाचा नमूना                                                                 दिनांक   /   /२०२४

अर्जदाराचे नाव: ——————————————————————
पुर्ण पत्ता ——————————————————————
——————————————————————
——————————————————————

आधारकार्ड क्रमांक ——————————————————
मोबाईल क्रं. ——————————————————

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर जि.सोलापूर

विषय :— श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे मालकीच्या मौजे ————————— ता. ————————— जिल्हा ————————————— येथील जमीनी भाडे पट्टयाने मिळणेबाबत...

महोदय,

आपले कडिल संदर्भीय जाहीर निवेदनाला अनुसरून विषयात व खालील नमुद केलेली जमीन त्यापुढे नमुद केलेल्या वार्षीक भाडेपट्टयाच्या रक्कमेला दिनांक   /   /२०२४ ते   /   /२०२५ या कालावधी साठी भाडेपट्टयाने शेती करणेसाठी घेण्यास मी इच्छुक आहे.

| अ क्र. | जिल्हा | तालुका | गाव | गट नं. | क्षेत्र हे. आर | भाडे पटटा रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सदर बाबतीत जाहीर फेर निवेदनामध्ये नमुद करण्यात आलेल्या खालील अटी व शर्ती मला मान्य आहेत.

१) वरील जमीन ही पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ चे कलम ३५ पोट कलम (२) (ख) च्या तरतुदीनुसार / **/२०२४ ते / /२०२५** या कालावधीसाठीच भाडेपट्टयाने देण्यात येईल.

२) श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीने नमुद केलेल्या किमान वार्षिक भाडे पट्टयाच्या रक्कमेपेक्षा जास्तीतजास्त पट्टयाची रक्कम देणाऱ्या व्यक्तीस जमीन पट्टयाने देण्यात येईल.

३) सदरचा वार्षिक भाडेपट्टा वर नमुद केल्याप्रमाणे वरील कालावधीसाठीच असल्यामुळे भाडेपट्टा घेणाऱ्या व्यक्तीने सदर शेतजमिनीच्या वहिवाटी बाबतची ठरलेली भाडे पट्टयाची रक्कम मंदिर समिती पंढरपूर कडे रोख अथवा डिमांड ड्राफ्टने भरण्याची आहे. त्यानंतरच भाडे पट्टेदाराला जमा रकमेची पावती देण्यात येईल सदर पावती मिळाल्यानंतरच संबंधित भाडे पट्टेदाराला जमीन कसण्याचा अधिकार प्राप्त होईल. उर्वरीत रक्कम वरील मुदतीत न भरल्यास वरील भरलेली अनामत रक्कम मला परत मिळणार नाही हे मला मान्य आहे.

४) जमीनीत इकडील परवानगी शिवाय कोणतीही मोठी सुधारणा करता येणार नाही. तसेच अनाधिकृत अतिक्रमण करता येणार नाही. जमिनीत अनाधिकृत वहिवाट आहे असे आढळून आल्यास ती पटटा धारकाने स्वता:चे जबाबदारीवर दुर करून घ्यावयाची आहे.

५) जमीनीत घ्यावयाच्या पिकासाठी व त्याबाबतच्या मेहनत मशागतीसाठी इकडून कोणताही मोबदला मागता येणार नाही.

६) जमीनी बाबतचा शेतसारा, शिक्षणकर, रोजगार हमी कर व वाढीव शिक्षणकर तसेच कॅनाल उपलब्ध असल्यास त्याची पाणी पट्टी, तसेच विद्युत पंप असल्यास त्याचे विद्युत बिल मंदिर समितीच्या वतिने मे.कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नांवे भरण्याची जबाबदारी पट्टेदाराची राहील. व त्या प्रमाणे बिल अदा केल्याच्या अस्सल पावत्या ज्या त्या वर्षी इकडे जमा करणे बंधनकारक राहील.

७) पट्टयाने दिलेल्या जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ मधील तरतुदीनुसार श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी धारण केलेली मिळकत असल्याने व ती देवस्थान जमीन असल्याने त्याबाबत म.ज.म. अधिनियम १९६६ व मुंबई कुळ कायदा व शे.ज. न्या. अधि. १९४८ मधील तरतुदीनुसार कोणत्याही सक्षम न्यायालयाकडे दाद मागता येणार नाही, तसेच सध्या व त्यात्या वेळी असलेल्या प्रचलित कायदयाचा कोणताही आधार घेऊन मंदिर समितीवर कोणतीही व कसलीही दाद मागता येणार नाही.

८) सदर जमिन वहिवाटीस देणे बाबत न्यायालयातील स्टे ऑर्डर (स्थगित आदेश) असले तर त्याबाबतची न्यायालयीन आदेशाची प्रत स्टे ऑर्डर (स्थगित आदेश)या कार्यालयाकडे सादर करावी.

९) समितीच्या या जमीनीच्या या क्षेत्रावर कोणताही बिनशेती वापर आणि कोणतेही बांधकाम करता येणार नाही. बांधकाम केल्यास भाडेपट्टा रद्द करणेत येईल.

१०) वरील प्रमाणे दिलेले गट नंबर मधील क्षेत्रामध्ये १ एकर क्षेत्रात मंदिरे समितीच्या गोशाळेतील गाईना चारा पुरवठा करणेस मी तयार आहे.

११) जमीनीच्या बांधावरील फळ झांडापासून मिळणाऱ्या उत्पन्नातील १/२ हिस्सा मंदिराकडे जमा करणे बंधनकारक राहील. शिवाय सदर क्षेत्रातील कोणत्याही झाडांची तोड करता येणार नाही.

वटलेले झाड असल्यास त्याची माहिती मंदिर समितीला देवून रितसर परवानगी घेवून त्याची विल्हेवाट लावता येईल.

१२) पट्टेदाराने वरील शर्तीचा भंग केल्यास सदरचा भाडेपट्टा मुदती आगोदर सुध्दा रद्द करण्याचा मंदिर समितीस हक्क राहणार आहे. त्यामुळे पट्टेदाराचे काही नुकसान झाल्यास त्याची कोणतीही जबाबदारी मंदिर समितीवर राहणार नाही.

१३) नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्याबाबत पट्टेधारकास इकडे कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मंदिर समितीकडे मागता येणार नाही.

१४) पट्टेदाराकडून उपरोक्त नमूद कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास कोणत्याही वेळी भाडेपट्टा रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाला राहील. पट्टा रद्द झाल्यास शेतातील उभ्या पिकांचे उत्पादन मंदिर समितीच्या मालकीचे होईल.

१५) वरील अटींची पुर्तता केली आहे याची खात्री झाल्यानंतरच जमीन पट्टयाने दिल्याचा आदेश दिला जाईल.

१६) भाडे पटटयासाठी जमा केलेली रक्कम कोणत्याही कारणास्तव परत मागता येणार नाही

१७) सदर क्षेत्राचा भाडे पटटा स्विकारण्याचा अथवा न स्विकारण्याचा अधिकार मंदिरे समितीस आहे.

१८) नमूना लिलाव अर्ज व माहिती कार्यालयीन वेळेत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे उपलब्ध होऊन मिळतील. तसेच ूण्अपजजींसतनाउपदपउंदकपतण्वतह या वेबसाईटवर मिळतील.

१९) ज्या वहिवाटदारास त्यावेळी इतर वहिवाटदाराने नमूद केलेल्या दरापेक्षा जास्त दराने बोली बोलावयाची असल्यास तशी संधी त्यावेळी देण्यात येईल. ज्या वहिवाटदाराने जास्तीतजास्त दर नमूद केला असेल किंवा जास्तीतजास्त दर बोलला असेल त्याच्या नावे लिलाव मंजूर करण्यात येईल.

२०) ज्याचे नावे लिलाव मंजूर होईल. त्यांनी लिलावाची होणारी संपूर्ण रक्कम ३ दिवासत भरणा करून विहीत नमून्यातील प्रतिज्ञापत्र सादर करावयाचे आहे. मुदतील भरणा रक्कम भरली नाही किंवा प्रतिज्ञापत्र सादर केले नाही तर सदरचा मंजूर लिलाव रद्द केला जाईल.

२१) निविदा फॉर्म भरून दिनांक २०/०७/२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत श्री. संत तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. लिलाव अर्ज समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशिरा आलेले अर्ज व अपूर्ण अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

२२) कोणताही अर्ज अगर सर्वच अर्ज कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिरे समितीने राखून ठेवले आहेत.

२३) मंदिरे समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते लिलावधारकांस बंधनकारक राहील.

२४) सदर कामासंबधी काही वाद उदभवल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२५) प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता लिलाव कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.

२६) सन २०२४ – २०२५ साठी निविदेव्दारे प्राप्त झालेले निविदा अर्ज खालील दिलेल्या जिल्हावार व तारखे प्रमाणे सकाळी ११.०० वा. पंढरपूर येथील मंदिरे समितीच्या श्री. संत तुकाराम भवन येथील जमिन विभाग यांचे कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र. | जिल्हा | लिफाफा उघडण्याची तारीख | लिफाफा उघडण्याची वेळ |
|---|---|---|---|
| १ | सातारा | **२६/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| २ | सोलापूर | **२७/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| ३ | सांगली | **२८/०७/२०२७** | सकाळी ११.०० |
| ४ | कोल्हापूर | **२८/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| ५ | अकोला | **२९/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| ६ | अमरावती | **२९/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| ७ | उस्मानाबाद (धाराशिव) | **२९/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| ८ | यवतमाळ | **३०/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| ९ | बुलढाणा | **३०/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| १० | नागपूर | **३०/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| ११ | वर्धा | **३१/०७/२०२४** | सकाळी ११.०० |
| १२ | अहमदनगर | **३१/०७/२०२४** | सकाळी ११.०० |

त्या वेळी आपण उपस्थित रहावे. सदरचे अर्ज त्या त्या तारखेस दिलेल्या वेळेत उघडण्यात येतील याची मी नोंद घेतली आहे.

२/— माझ्या ओळखीच्या व रहीवाशी पुराव्यासाठी मी खालील कागदपत्राच्या सत्यप्रती सोबत सादर केल्या आहेत. आधार कार्ड / निवडणूक ओळखपत्र / राष्ट्रीयकृत बॅकेचे पासबुक / ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी एकाची सत्यप्रत, रेशनकार्ड, स्वतःचे नावाचे लाईट बिल किंवा फोन बिल याची सत्यप्रत सोबत जोडलेले आहेत.

तरी मी विनंती करतो कि, वर नमुद केलेली जमीन /जमीनी मला पट्टयाने मिळावी. ही नम्र विनंती.

आपला विश्वासू,

## प्रतिज्ञापत्राचा नमूना

मे. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार ------ तहसिल ------ जिल्हा ---------- यांचे समोर मा. कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर यांना मी श्री. ----------------- रा. ------- ता. ------- जिल्हा ------------- वय -- वर्षे व्यवसाय --

शपथपूर्वक प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, मौजे --------- ता -------- जिल्हा ----------- येथील कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर यांचे नावे खालील तपशिला प्रमाणे असलेली देवस्थान जमीन/जमीनी ११ महिने (  /  /२०२४ ते  /  / २०२५) मुदतीच्या पट्टयाने घेण्याबाबत खालील अटी मला मान्य आहेत. व सदर अटीचे मी पालन करण्यास तयार आहे.

| अ.क्र. | जमीन गट नंबर/स.न. | क्षेत्र हे. आर | जमीनीचा प्रकार जिराईत/बागाईत | जमीनीचा वार्षिक पटटा ( रूपये ) |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

**<u>अटी</u>**

**१)** वरील जमीन /जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ चे कलम ३५ चे पोट कलम (२) (ख) च्या तरतुदी अनुसार ६ महिने कालावधीसाठी पट्टयाने देण्यात येईल हे मला मान्य आहे.

**२)** सदर पट्टा ११ महिने कालावधीचा आहे. व त्यानंतर माझी जमीन कसण्याची इच्छा झाल्यास पुन्हा ११ महिन्याचा पट्टा मिळण्यासाठी नव्याने अर्ज व प्रतिज्ञापत्र मी दिनांक  /  /२०२५ पूर्वी लिहून देणार आहे.

**३)** सदर जमीनीतून मिळणाऱ्या उत्पन्नाचे पोटी मंदिर विश्वस्त व्यवस्थापनेसाठी वर नमूद केलेला जमीनीचा वार्षिक भाडे पटटा रक्कम रूपय    /-- मी दिनांक  /  /२०२ पूर्वी भरणेस बांधील आहे. त्याशिवाय मला जमीन वहिवाट करणेचा अधिकार नाही. हे मला मान्य आहे.

**४)** जमीनीत वरील जमीन धारकाचे परवानगी शिवाय कोणतीही मोठी सुधारणा करणार नाही तसेच अतिक्रमण करणार नाही.

**५)** जमीनीत घ्यावयाचे पिकासाठी व त्याबाबतच्या मेहनत मशागतीसाठी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिकडून कोणताही मोबदला मी मागणार नाही.

**६)** सदर जमीनी बाबतचा जमीन शेतसारा, शिक्षणकर, रोजगार हमी कर व वाढीव शिक्षण कर तसेच कॅनॉल उपलब्ध असल्यास त्याचे पाणी घेण्यासाठी लागणारी पाणी पट्टी, तसेच विद्युतपंप असल्यास त्याचे विद्युत बिल मी भरण्यास तयार आहे व त्याबाबतचे बिल अदा केल्याच्या पावत्यांच्या सत्यप्रती कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर यांचेकडे मुळप्रती त्याच्या खरेपणा बद्दल दाखवून मी तात्काळ जमा करण्यास तयार आहे.

**७)** वरील जमीनी या पंढरपूर मंदिरे अधिनियम १९७३ मधील तरतुदीनुसार कार्यकारी अधिकारी श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिति, पंढरपूर यांनी धारण केलेली मिळकत असलेने व ती श्री.विठ्ठल रूक्मिणी पंढरपूर या देवस्थानची मिळकत असलेने त्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल

अधिनियम १९६६ व मुंबई कुळ कायदा व शेत जमीन न्यायाधिकरण अधिनियम १९४८ मधील तरतुदी अनुसार कोणत्याही सक्षम न्यायालयाकडे मला दाद मागता येणार नाही. अगर सध्या व त्यात्या वेळी असलेल्या प्रचलित कायदयाचा कोणताही आधार घेऊन मंदिर समितीवर कोणतीही व कसलीही दाद मागता येणार नाही.

**८)** वरील जमीनीत मी कोणतेही बांधकाम करणार नाही.

**९)** गट नं.        मधील १ एकर शेतात मंदिरे समितीच्या गोशाळेतील गाईंना चारा पुरवठा करणेस तयार आहे.

**१०)** सदर जमीनीतील कोणत्याही झाडांची तोड करणार नाही. एखादे झाड वटले आहे असे माझे निर्दशनास आल्यास त्यांची माहिती मंदिर समितीला मी ताबडतोब देईन व त्यांचे कडून जो निर्णय त्याबाबत घेतला जाईल तो मला मान्य असेल.

**११)** सदर जमीनी बाबत माझा कोणताही हक्क मी सांगणार नाही.

**१२)** नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा इतर कोणत्याही कारणामुळे पिकाचे नुकसान झाल्यास त्याबाबत पट्टेधारकास मंदिर समितीकडे कोणत्याही प्रकारची रक्कम अथवा नुकसान भरपाई मागता येणार नाही.

**१३)** वरील प्रमाणे सर्व अटी मला मान्य आहेत तरी मला वर नमूद  जमीन पट्टयाने दिल्याचा आदेश मंदिर समितीच्या निर्णया नुसार देण्यात आल्या नंतर मी त्याचे पालन करण्यास तयार आहे.

**१४)** मंदिरे समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते लिलावधारकांस बंधनकारक राहील.

**१५)** सदर कामासंबधी काही वाद उदभवल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

**१६)** प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता लिलाव कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.

हे प्रतिज्ञापत्र आज दिनांक    /    /२०२४ रोजी तहसिल कार्यालय ———— जिल्हा —————— येथे शपथेवर लिहून दिले आहे.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असून यात कांही चुक आढळल्यास भारतीय दंड विधान संहिता कलम २००, १९९, १९३ (२) नुसार दंडास अगर शिक्षेस मी पात्र राहीन.

साक्षीदार

प्रतिज्ञापत्र लिहून देणाराची सही

श्री.

हे माझे पुर्ण परिचयाचे असून मी त्यांना ओळखतो

सही                                                    सही

श्री. ————————————————————    श्री. ——————————————————————